**दि.कि.अर्ज क्र. ३४३/२०२२**

**सय्यद शाहीनबी लियाकत अली व इतर ५ ...विरुध्द....कोणीही नाही.**

**CNR No. MHJG1300 1951 2022**

# आदेश

## (निशाणी क्र. १ खाली)

प्रस्तुतचा अर्ज भारतीय पुरावा कायदा (Indian Succession Act) नुसार वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी सादर करण्यात आला आहे.

२. अर्जदारांचा अर्ज वाचला व अभिलेखावरील पुरावा प्रतिज्ञापत्र व कागदपत्रांचे अवलोकन केले.

३. अर्जदारांतर्फे असे सादर करण्यात आले आहे की, अर्जदार क्र. १ ते ६ यांच्या आईची आई नामे अरस्तुलबी हबीब पठाण ही दिनांक १३/०६/२०२१ रोजी मयत झाली आहे व अर्जदाराची आई नामे सईदा बी लियाकत अली ही दिनांक ११/०५/२०२० रोजी मयत झाली आहे. मयत अरस्तुल बी व सईदा बी यांना अर्जदारांव्यतिरिक्त अन्य कोणतेही हयात वारस नाहीत.

४. अर्जदारांतर्फे पुढे असे सादर करण्यात आले आहे की, मयत अरस्तुलबी हबीब पठाण यांचे हयात असताना सेंट्रल बँक ऑफ इंडिया येथे बचत खाते होते. त्या खात्याचा क्रमांक ३९१२७८९१५६ असून त्यात रक्कम रुपये १०,०००/- शिल्लक आहेत. सदर खात्यास अर्जदारांची आई नामे सईदा बी यांना वारस लावण्यात आलेले आहे. परंतू सईदा बी ही देखील मयत झाली आहे. वारस म्हणून सदर खात्यातील शिल्लक रक्कम मिळावी यासाठी अर्जदार यांनी संबंधित बँक अधिकारी यांचेकडे अर्ज केला असता त्यांनी सक्षम न्यायालयातून अर्जदार हे मयत अरस्तुलबी हबीब पठाण व मयत सईदा बी लियाकत अली सय्यद यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र आणण्यास सांगितले म्हणून अर्जदारांनी सदरचा अर्ज दाखल केला आहे. तरी अर्जदार यांचे नावे वारस दाखला मिळावा अशी विनंती करण्यात

आली आहे.

५. सदर अर्जाचे स्वरुप व मागणी पाहता दिनांक १८/११/२०२२ रोजीचा दैनिक बातमीदार हया वर्तमानपत्रातून जाहिर नोटीस नि.९ काढून अर्जदार यांच्या अर्जास जनमानसातून हरकती मागवण्यात आल्यात. परंतू आजपावेतो कोणीही सदर अर्जास हरकत उपस्थित केलेली नाही.

६. प्रस्तुत अर्जाकामी खालील मुद्दे माझे विचारार्थ उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष मी खाली दिलेल्या कारणमिमांसेच्या आधारे स्पष्ट करीत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अर्जदार हे मयत अरस्तुलबी हबीब पठाण व मयत सईदा बी लियाकत अली सय्यद यांचे कायदेशीर वारस आहेत ही बाब अर्जदार शाबित करतात काय ? | ....होय |
| २. | अर्जदार मागणीप्रमाणे वारसहक्क प्रमाणपत्र मिळणेस पात्र आहेत काय ? | ....होय |
| ३. | काय आदेश ? | ...अर्ज मंजुर. |

७. अर्जातील मागणी शाबित करण्यासाठी अर्जदार सय्यद शाहीनबी लियाकत अली (अ.सा.क्र.१) यांचा पुरावा, प्रतिज्ञापत्र (नि.८) देवून नोंदवण्यात आला आहे. साक्षीदार सय्यद शाहीनबी (अ.सा.क्र.१) यांचा शपथेवर देण्यात आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता तो अर्जाचे प्रतिरुप आहे. तिचे पुराव्यानुसार मयत अरस्तुलबी व सईदा बी यांना अर्जदारांव्यतिरिक्त अन्य कोणतेही हयात वारस नाहीत. अभिलेखावर दाखल मृत्यु प्रमाणपत्र नि.१० व ११ चे अवलोकन करता अरस्तुल बी हबीब पठाण व सईदा बी लियाकत अली सय्यद हे मयत असल्याचे अवगत होते.

८. हयाठिकाणी हे नमुद करणे आवश्यक आहे की, दैनिक बातमीदार हया वर्तमानपत्रातून वरप्रमाणे जाहिर नोटीस नि.९ काढून देखील आजपावेतो कोणीही सदर अर्जास हरकत उपस्थित केलेली नाही व अभिलेखावरील अर्जदारपक्षाचा पुरावा

आव्हानित झालेला नाही. त्यामुळे अर्जदारपक्षाचा पुरावा नाकारण्यात कोणतेही कारण उपलब्ध नाही. परिणामी अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ व २ साठी होकारार्थी निष्कर्ष नोंदवित असून मुद्दा क्र. ३ साठी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) मयत अरस्तुलबी हबीब पठाण यांच्या सेंट्रल बँक ऑफ इंडिया चोपडा येथील बचत खाते क्रमांक ३९१२७८९१५६ हया बचत खात्यात शिल्लक रक्कम रुपये १०,०००/– (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) व्याजासह प्राप्त होण्यासाठी अर्जदार क्र. १ ते ६ यांचे लाभात विहीत नमुन्यात वारस प्रमाणपत्र जारी करण्यात यावे.

३) नियमानुसार न्यायालयीन शुल्काची आकारणी करण्यात यावी.

MAHADEVI NAGORAO RATHODE

Digitally signed by MAHADEVI NAGORAO RATHODE
Date: 2023.02.24 15:56:24 +0530

स्थळ – चोपडा. (श्रीमती एम. व्ही. पाटील–राठोडे)

दिनांक २४/०२/२०२३. दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

चोपडा, जि. जळगाव.